




# हॅप्पी पेरेंटिग : शाळा भविष्यातली!

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (23 July 2023)

इसवीसन २०१० नंतर जन्माला आलेली मुले - अर्थातच जेन-अल्फा पिढी- ही त्यांच्या हाताला 'तंत्रज्ञानाचं सहावं बोट' घेऊन जन्माला आलेली आहे. या पिढीचे प्रश्न वेगळे आहेत. सध्याच्या पिढीत ज्ञान मिळवायला गुरुगृही जायला लागत नाही, तर ही पिढीच ज्ञानाच्या महासागरात जन्माला आलीय. असं असेल, तर काही वर्षांत ' मुलांची शाळा व शिक्षण' प्रचंड प्रमाणात बदलणार आहे! फार नाही, जेमतेम १०-१५ वर्षांत शिक्षणपद्धतीत जी क्रांती घडणार आहे, आज त्याच्याबद्दल थोडेसे भविष्यरंजन!

१) शिक्षणाची तंत्रं : खडू-फळ्यापासून, व्हाईट बोर्ड आणि स्केचपेनपासून आता थेट संगणकासारखा व्हर्च्युअल व्हाईट बोर्ड शाळांमध्ये पोचायला लागलाय. तंत्रज्ञानाचं सहावं बोट लागलं, की हा 'फळा' जिवंत होऊन चांद्रयानाचं प्रक्षेपण दाखवू शकतो. आता फळ्यावरचा रोजचा सुविचार मुलं लिहिणार नाहीत, तो आपोआपच उमटेल. बघता बघता फळ्यावरचे सुवाच्य अक्षरात लिहायची गरज संपेल! मोबाईलवर सगळंच इनबॉक्समध्ये आलेलं असेल! प्रश्न आहे मुलांच्या डोक्यात कितपत शिरलं असेल याचा?

२) शिक्षकांमध्ये बदल होणार : एके काळी गणिताचे शिक्षक गणितात ‘भारी’ असायचे, इंग्रजीच्या शिक्षिकेनं शेक्सपिअर कोळून प्यायलेलं असायचे! आता हळूहळू याची गरजच राहणार नाही? मुलांशी अति प्रेमाने बोलून, त्यांच्या कलानं घेत डिजिटल तंत्राची बरोबर ‘लिंक्स’ वापरता येणं हेच शिक्षकांचं कौशल्य राहील! त्यामुळे आजतागायत चालत आलेले शिक्षक यातून अंग काढून घेण्याची भीती वाढलीय. ऑक्टोबर २०२२ मधील फोर्ब्ज (Forbes) नियतकालिकात एका सर्वेक्षणात ठामपणे मांडलंय, की भविष्यात शिक्षकांची प्रचंड कमतरता जाणवणार आहे, त्याहूनही काळजीचं म्हणजे शिक्षकांना शिक्षण पेशात स्वारस्यच वाटणार नाही! कारण मुलं घडवण्याची जबाबदारी संपलीय.

३) शिस्त आणि संस्कारांची व्याख्याच बदलेल : शाळेच्या घंटेपासून, वर्गातल्या हजेरीपर्यंत सगळ्याचीच गरज भविष्यात संपणार आहे. आत्तासुद्धा शहराल्या बऱ्याच शिशुशाळेत सीसीटीव्ही बसलेत आणि पालक कधीही वर्गात काय चाललंय हे बघू शकतात! परिणामत: शाळेच्या शिस्तीच्या भिंती कोसळणार आहेत, आता सत्ता मुलांची असेल, शिक्षक त्यांचे मदतनीस, फार तर मार्गदर्शक असतील.

४) कदाचित शाळेचे अस्तित्व राहणार नाही : कोविडच्या आधीपासून ‘होम-स्कूल’ची कल्पना रुजू लागली होती. आता ती फोफावणार आहे! व्हर्चुअल शाळा ही फार दूरची गोष्ट नसणार आहे. ऑस्ट्रेलियात ‘स्कूल ऑफ द एअर’ ही ऑनलाइन शाळा हजारो मुलांना शिकवतीय!

पालक मित्रांनो, हे भविष्याबद्दलचं स्वप्नरंजन चांगलं की वाईट हे काळच ठरवेल! पण मुलांमधलं माणूसपण टिकलं पाहिजे एवढं मात्र खरं.

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

www.chiranjeevgodbole.com